**निशाणी क्रमांक – ४३**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –

माझे नांव – सचिन शिवराज अलापुरे,

वय – ३८ वर्षे, धंदा – शेती,

रा. उजना, ता. अहमदपूर, लातूर.

**<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे श्री एन. ए. भांगे.</u>**

**०१.** दिनांक २९.१०.२०२३ रोजी पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्याकरीता बोलवले नव्हते. पोलीसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला नाही. मी शेताकडे जात असताना श्रीरामे साहेब यांनी मला सही करण्यास सांगीतले म्हणून मी सही केली. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यातील मजकुर मला माहिती नाही. सहीस **निशाणी क्र.४४** देण्यात येते.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे अभियोग पक्षाच्या विनंतीवरुन फौ.प्र.संहितेवरुन कलम १५४ अन्वये सुचक प्रश्न विचारण्यास परवानगी देण्यात आली.</u>**

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी मला दि.२९/१०/२०२३ रोजी पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी उजना येथे सदगुरूनाथ मंदीराच्या कमानीच्यासमोर रोडवर बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्यासमक्ष सायंकाळी ५ ते ५.३० वाजण्याच्या दरम्यान पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा वाचून दाखवून त्यानंतर माझ्या सह्या घेतलेल्या आहेत. हे

म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखीचे आहेत म्हणून आरोपींच्या सांगण्यावरून त्यांना शिक्षा होऊ नये यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. यु.व्ही.जाधव.**

नाकारला.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

माझे समक्ष,

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2026.04.29 18:20:32 +0530

**(स्वानंदी दे. वडगांवकर)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहमदपूर.